**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल**

**अपिल क्रमांक : के.आर- ३५९८/२०२२**

**अपिलार्थी, श्री.प्रेम कुमार बजाज,**
द गार्डन व्यू सोसायटी, रुम नं. १,
प्लॉट नं.३७५, सेक्टर १९, कोपरखैरणे,
नवी मुंबई ४०० ७०९.

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा अतिरिक्त कार्यकारी अभियंता, कोपरखैरणे उपविभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, प्लॉट नं. २१९, सेक्टर १९, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७०९.

प्रथम अपीलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, वाशी विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, विद्युत भवन, प्लॉट नं.५,सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४०० ७०३.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : ०५.०१.२०२६**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १७.०८.२०२२ | -- | ०३.१०.२०२२ | -- |

अपिलार्थी यांनी दि. १५.१२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये *" माहिती मिळाली नाही "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक ०५.०१.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थीचे प्रतिनिधी श्री.जतीन प्रेम बजाज उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत). तसेच जन माहिती अधिकारीश्री.संजय विठ्ठल पोळ, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, उप विभाग-कोपरखैरणे, म.रा.वि.वि.मर्या., उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

"

1) *०१ अगस्त २०१६ से ३ अक्टुबर २०१८ की अवधि के दौरान कोपरखैरणे के केवल सेक्टर १९ एवं सेक्टर २० मे औद्योगिक विद्युत आपूर्ति हेतु नवीन कनेक्शनों की सूची लिखित मे दिजिए।*
2) *०१ अगस्त २०१६ से ३० अक्टॅबर २०१८ की अवधि के दौरान कोपरखैरणे के केवल सेक्टर १९ ऑर सेक्टर २० में वीज चोरी करते पकडे गए ग्राहकोंकी सूची लिखित में दीजिए।"*

सदर प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी असे निवेदन केले की, या प्रकरणातील नस्ती त्यांना उपलब्ध झाली नाही. त्यामुळे ते आज यासंदर्भात निश्चितपणे सांगू शकत नाहीत. सदर नस्तीचा शोध घेऊन, आयोगास माहिती देण्यासाठी त्यांनी दहा दिवसांची वेळ मागीतली आहे.

जन माहिती अधिकारी यांची ही विनंती लक्षात घेता सदर प्रकरण पुढील तारखेस ठेवण्यात येत आहे. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.२१.०१.२०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता घेण्यात येईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ०५ जानेवारी, २०२६.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

संगणक-११